# पुस्तिका क्रमांक १३

## अर्थसहाय्य योजना कार्यान्वित करण्याची पध्दती ( विभागून दिलेल्या रकमासह व या कार्यक्रमातंर्गत घेतलेल्या लाभार्थींची सविसतर माहिती )

<u>अनुदान/आर्थिक सहाय्यक अशासारखे संस्कारक्षम कार्यक्रम</u> :

हॉस्पिटलचा गरीब धर्मादाय निधी आहे. या फंडातून गरजू लोकांना सूचीवर नसलेली औषधे दिली जातात. काही विशेष चाचण्या ज्या इतर हॉस्पिटलमध्ये कराव्या लागतात. त्यासाठी लागणारा पैसा धर्मादाय निधीतून वापरला जातो.

हॉस्पिटलकडून देण्यात येणा-या मोफत सुविधा :

सदरहू फंडव्दारे गरीब गरजू रुग्णांना आर्थिक मदत पुरविली जाते. त्यासाठी काही मर्यादा ठरविण्यात आलेली नाही, परंतू गरजेनुसार मदत अवलंबून असते.

गरीब धर्मादाय निधीकडून आर्थिक मदत मिळविण्यासाठी व्यक्ती दारिद्रय रेषेखाली येणारी असावी लागते. तसेच रुग्णाच्या ओपिडी फॉर्मवर संपूर्ण माहिती असावी लागते.

सदरहू सुविधांचा फायदा घेण्यासाठी एका को-या कागदावर अर्ज लिहून तो समाज विकास अधिकारी यांचेकडे देण्यात येतो. त्यासाठी अर्जाचे शुल्क भरावे लागत नाही. सदरहू अर्जासोबत एक केसपेपरची झेरॉक्स प्रत लावावी. समाज विकास अधिकारी सदर रुग्णाची व त्याचे नातेवाईकांची विचारपूस करुन सदरचा अर्ज आपल्या अभिप्रायासह अंतिम मंजूरीसाठी प्रमुख वैद्यकिय अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येतो. यासाठी साधारणपणे एक दिवसाचा अवधि लागतो.

आवश्यक असणारी औषधे हॉस्पिटलकडून खरेदी करुन रुग्णांना दिलेली जातात. कोणत्याही प्रायव्हेट चाचणीची गरज असल्यास हॉस्पिटल फी भरणा करण्यासाठी मदत करते.

<u>कुष्ठपिडीत अपंगांना अर्थिक सहाय्य योजना</u>

बृहमुंबई महानगरपालिकेतर्फे खालील नियम व अटीची पुर्तता करणा-या मुंबईतील कुष्ठरोगामुळे ४०% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या पिवळया वा केशरी शिधापत्रीका धारण करणा-या व्यक्तीसाठी जुलै २०१४ पासून मासिक रु. १०००/- ऐवढी आर्थिक सहाय्य योजना कार्यान्वित करण्यात आली आहे व हि मदत सद्यस्थितीत मासिक रु. २५००/- एवढी करण्यात आली आहे.

**नियम व अटी**

1. पिवळे व केशरी शिधापत्रिका धारक कुष्टरोगामुळे ४०% पेक्षा जास्त कार्यात्मक/ क्रियात्मक अपंगत्व असलेल्या कुष्ठपिडीत रुग्णास अर्ज करता येईल.
2. अर्जदार कुष्ठपिडीत अपंग व्यक्तीचे मुंबई महानगरपालिका परिसरात वास्तव्य असणे आवश्यक राहील. त्याकरीता पुराव्यर्थ रेशनकार्ड / मतदार ओळखपत्र / फोटोपास / घरपटटी पावती / लाईट बिल व आधार कार्ड इत्यादीची साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील.
3. अर्ज सादर करण्याच्या तारखेस अर्जदारचे वय १८ वर्षे पुर्ण असणे आवश्यक राहील.
4. कुष्ठरोगामुळे ४०% अपंगत्व असल्याबाबतचे सरकारी किवा निमसरकारी रुग्णालयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
5. पात्र अपंगत्व कुष्ठपिडीत लाभार्थीला दरमहा रु २५०० /- चे अर्थसहाय्य ई.सी.एस. (E.C.S.) ने राष्ट्रीयकृत बॅकेच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी पात्र लाभार्थीने E.C.S. साठी लागणा-या कागदपत्राची पूर्तता करणे व महापालिकेचा Vender नंबर घेणे आवश्यक राहील
6. अर्थसहाय्य मिळणा-या लाभधारकास दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात हयातीचा दाखला ऍक्वर्थ महापालिका कुष्ठरोग रुग्णालय येथे जमा करणे आवश्यक राहील.

सही/-
कार्यकारी आरोग्य अधिकारी
सार्वजनिक आरोग्य खाते